ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## December Special Issue : III - 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | २००० नंतर ललितगद्यातील बदलते चित्रण | ज्योती सुधाकर चव्हाण | 149-153 |
| 31 | एकविसाव्या शतकातील ' सर्व प्रश्न अनिवार्य' | अंगद श्रीपती भुरे | 154-159 |
| 32 | मराठी साहित्यातील विविध प्रवाह: स्थितीगती आणि मूल्यमापन. | ज्ञानदेव रामभाऊ रणशूर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 160-163 |
| 33 | देशीवाद आणि समकालीन मराठी कादंबरी | वऱ्हाडे बापुराव भास्कर | 164-167 |
| 34 | आदिवासी कथा साहित्याचे स्वरूप | शंकर रामजी बर्गे<br>डॉ.एम.ए.कव्हळे | 168-171 |
| 35 | बालकिशोरांची अवकाशज्ञानाची जिज्ञासापूर्ती करणारा काव्यसंग्रह- 'आकाशगंगा ' | प्रा.पुरुषोत्तम प्र. सूर्य | 172-175 |
| 36 | समकालीन व्यक्तिचित्रे : एक आकलन | भगवान मुरलीधर बांगर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 176-179 |
| 37 | समाजव्यवस्थेची कानउघाडणी:बिघडलेले होकायंत्र | मधुकर बालासाहेब जाधव<br>डॉ.ललित अधाने | 180-182 |
| 38 | २००० नंतरचे आदिवासी साहित्य | बागुल कौशल्या तुळशीराम<br>डॉ.भाऊसाहेब विठ्ठलराव गमे | 183-186 |
| 39 | साहित्यातील विविध प्रवाह : २००० नंतरची निर्मिती,स्थितीगती आणि मूल्यमापन | शैलजा सटवा ओव्हाळ<br>डॉ.मनोहर सिरसाट | 187-193 |
| 40 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्यातील कादंबरी | सौ.विजया योगेश साळोखे | 194-196 |
| 41 | २००० नंतरच्या भटक्याविमुक्तांच्या कवितेतून प्रकट होणारे अनुभव विश्व | मनोज रामजी मुनेश्वर | 197-203 |
| 42 | " २००० नंतरच्या निवडक स्त्रीवादी कादंबऱ्या " | अंजली विठ्ठलराव मुसांडे | 204-209 |
| 43 | इ.स. २००० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | शिंदे अनिता पर्वती<br>प्रा.डॉ.बालाजी नागटिळक | 210-214 |
| 44 | २००० नंतरची मराठी कादंबरी आणि किशोरवयीन व्यक्तिरेखा | श्री. सुनील अंबादास आहिरे<br>डॉ.किरण नामदेव पिंगळे | 215-221 |
| 45 | शांता जर्नादन शेळके: व्यक्ती आणि वाङ्मय | सौ.अंजली माधव देशपांडे | 222-223 |
| 46 | जागतिकीकरणात मराठी साहित्य आणि संस्कृतीचे अस्तित्व | डॉ.बी.जी.श्रीरामे | 224-227 |

# मराठी साहित्यातील विविध प्रवाहः स्थितीगती आणि मूल्यमापन

**ज्ञानदेव रामभाऊ रणशूर**
संशोधक

**डॉ.भाऊसाहेब राठोड**
मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना :**

साहित्य ही व्यापक संकल्पना आहे, तर वाङ्मय ही एक कला आहे. साहित्यामध्ये ललित आणि ललितेत्तर साहित्य असे दोन भाग पडतात. ललित साहित्यात कल्पना, भावना लेखकाची अभिव्यक्ती व अनुभव व्यक्त होत असतात तर ललिततेत्तर साहित्यात वैचारिकतेला प्राधान्य दिले जाते. मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रवाहांचा अभ्यास करत असताना प्राचीन साहित्य,अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य आणि समकालीन साहित्य या तीन प्रकारांचा थोडक्यात परामर्श घेता येईल.

प्राचीन साहित्य.

साधारणपणे ११ व्या शतकापासून तर १८ व्या शतकापर्यंत प्राचीन मराठी साहित्याचा विचार होतो या कालखंडात महानुभाव संप्रदायाच्या साहित्याने सुरुवात होऊन वारकरी संप्रदायाच्या संत ज्ञानेश्वरांपासून तर संत रामदास यांच्यापर्यंत तसेच पंडिती साहित्यातील मुक्तेश्वरांपासून तर मोरोपंतांच्या साहित्यापर्यंत आणि शाहिरी साहित्यातील राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा यांच्या साहित्य रचनेचा विचार होतो. प्राचीन साहित्य रचना काव्यात्म आहे. तसे संस्कृत साहित्य काव्यात्म स्वरूपाचेच आहे. मुळात साहित्याची सुरुवात ही काव्यातुन झालेली आहे.

**अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य.**

१८ व्या शतकापासून निर्माण झालेल्या मराठी साहित्याला अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य असं म्हटल जात या शतकाच्या सुरुवातीला मराठी राज्याचा अस्त झाला आणि महाराष्ट्रामध्ये इंग्रजी राजवटीची सत्ता आली ही सत्ता जवळपास दीडशे वर्ष या देशात चालली, इंग्रजी राजवटी मधील इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून या काळातील लिखाण झाले. १९८५ पर्यंतचा काळ हा तर अव्वल इंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो. इंग्रजी साहित्याची भाषांतरे, रूपांतरे तसेच अनुकरण यातून अर्वाचीन किंवा आधुनिक साहित्याची वाटचाल सुरू झाली. मराठी साहित्य-विचाराची जडणघडण तत्कालीन नियतकालिकांमुळे महत्वाची ठरते. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ मध्ये सुरू केलेल्या मराठीतील पहिल्या 'दर्पण' या पत्राने महाराष्ट्रात प्रबोधन युगाचा प्रारंभ झाला आणि समाजातील वेगवेगळे प्रश्न पुढे येऊ लागले त्याचबरोबर ज्ञानोदय, मराठी ज्ञान प्रसारक, विविध ज्ञानविस्तार, निबंधमाला १८७४, मनोरंजन-निबंधचंद्रिका १९८७ या नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची ठरते. १८८५ ते १८२० हा काळ मराठी कथा कादंबरी, काव्य आणि नाटक या वाङ्मय प्रकारांच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचा ठरतो. १८८३ मधील किर्लोस्करांचे पहिले 'सौभद्र' नाटक, हरि नारायण आपटे यांची १९८५ मधील 'मधली स्थिती'

ही कादंबरी तर केशवसुतांची १८८५ मधील पहिली कविता ही साहित्य निर्मिती आधुनिक साहित्यातील पहिले साहित्य ठरते.

**समकालीन साहित्य :**

समकालीन साहित्याचे अस्तित्व १९४५ नंतरच्या काळात दिसून येते. समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळा सोबत असते ज्या काळात ते निर्माण होते त्या काळातील एकूण प्रतिबिंब त्या मध्ये स्पष्ट दिसून येते त्या काळातील विचार त्या काळातील भावना त्या काळातील प्रश्न त्या काळातील जाणिवा त्या काळातील मतं ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य, साधारणपणे हा कालखंड भारतीय स्वातंर्त्याचा कालखंड होता या काळात भारतीय स्वातंर्त्यामुळे मानवी जीवनात जो अमुलाग्र बदल झाला त्या बदलाचे प्रतिबिंब समकालीन साहित्यामध्ये अग्रक्रमाने मांडलेले दिसते.

**वाङ्मयीन चळवळीचे स्वरूप :**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७० वर्षाच्या काळामध्ये मराठी साहित्याने अनेक स्थित्यंतराचा अनुभव घेतलेला आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आलेले दुसरे जागतिक महायुद्ध ही जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना ठरली आहे १९३९ ते १९४५ अशा दीर्घ कालखंडात चाललेल्या या जागतिक महायुद्धाने संपूर्ण जगाचा नकाशा बदलला. हुकूमशाही राजवटीचा अंत होऊ लागला रशियामध्ये साम्राज्यवादाचा उदय झाला याच काळात भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात येत होती संपूर्ण जगाला या महायुद्धाने सावध केले होते अशा एक ना अनेक घटनांमुळे समाज जीवनात वेगवेगळे बदल दिसून येत होते दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम सामाजिक राजकीय आर्थिक जीवनावर झाला तसाच तो जागतिकीकरणावर आणि वाङ्मयावर देखील झाला या एकूण परस्पर संबंधांमुळे साहित्यामध्ये अनेक बदल झाले वांग्मयीन चळवळी व नव साहित्य प्रवाह उदयास आले साहित्यामध्ये आशय आणि अभिव्यक्ती दोन्ही अंगाने अधिक बदल होत गेले शिक्षण प्रसार सामाजिक मूल्यांवर आधारित असलेली समाज रचना त्याचबरोबर प्रांतवार भाषेला दिलेले महत्त्व यामुळे प्रादेशिक भाषेला स्वतःचे मिळालेले अस्तित्व या सगळ्या घटनांमुळे मराठी साहित्य व वांग्मय चळवळ अधिक बळकट होत गेली व मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करत राहिली यातूनच या काळातील साहित्य हे नव साहित्य म्हणून उदयास आले या साहित्याला स्वातंर्त्यपूर्व साहित्य आणि स्वातंर्त्योत्तर साहित्य असे ही म्हटले गेले.

**साहित्यातील विविध प्रवाह :**

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य,स्त्रीवादी साहित्य, प्रादेशिक साहित्य, विज्ञान साहित्य, मुस्लिम साहित्य, महानगरीय साहित्य,बालसाहित्य, ललित गद्य अशा वेगवेगळ्या साहित्य प्रवाहाचा विचार करता येतो या सर्व साहित्य प्रवाहामधून विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. या कालखंडातील महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले जाते. त्याच्या केंद्रस्थानी शेतकरी असून 'शेती पिकली तर सगळे

जगतील' हे मुख्य सूत्र असल्याने त्याला जीवनदाता असे संबोधले गेले परंतु या जीवनदात्याच्या जीवनात अनेक प्रश्न आहेत त्या प्रश्नांना घेऊन ग्रामीण साहित्याची सुरुवात झाली ग्रामीण भागातील जीवनानुभव, रूढी-परंपरा, संस्कार, संस्कृती तेथील दुःख-दैन्य, शैक्षणिक स्थिती, ग्रामीण भागातील राजकारण, ग्रामीण जीवनातील अपेक्षाभंग, ग्रामीण मनाचा उद्रेक, अशा एक ना अनेक प्रश्नांना घेऊन दिशा देण्याचे काम ग्रामीण साहित्याने केले.एकूण ग्रामीणतेचा परीघ साठोत्तरी साहित्यातील कथा, कादंबरी,काव्य या मधून मोठ्या प्रमाणात दिसून येतो. १९९० नंतरच्या कालखंडात तर मोठ्या प्रमाणात ग्रामीण साहित्य निर्मिती झाली त्यातील काव्य रचनेत अनेक कवी  महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशात अनुभवांचे संचित आपल्या काव्यरूपातून मांडताना दिसतात. यामध्ये प्रामुख्याने इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, प्रकाश होळकर, केशव देशमुख, गणेश देशमुख, एकनाथ पाटील, प्रदीप पाटील, अजय कांकर, लक्ष्मण महाडिक, नारायण सुमंत,दयासागर बन्ने, गोविंद पाटील, रमेश चिल्ले, प्रकाश किनगावकर, प्रकाश घोडके, जयराम खेडेकर, अशा अनेक कवींचा उल्लेख करता येतो या एकूणच कवींनी आपल्या साहित्यात बदलत्या ग्राम संस्कृतीचे चित्रण, निसर्ग व शेतकऱ्यांचे जीवन, त्याचे भाव विश्व, मातीची सर्जकता, कृषी संस्कृतीतील भावविश्व, ग्रामीण माणसाचे दुःख, जीवन जाणिवा, ग्राम संस्कृतीतील स्त्रीचे भावविश्व, तिचे मनोधैर्य, शोषितपणा, जगण्यातील शहाणपण असे अनेक प्रश्न घेऊन ग्रामीण साहित्यात जिवंतपणा निर्माण केला. प्रादेशिक साहित्याचा विचार करता प्रादेशिक जीवन पद्धती भाषा विचार यानुसार साहित्य बदलत जाते हे प्रादेशिक साहित्या मध्ये पहावयास मिळते. स्वातंत्र्यपूर्व प्रादेशिक जीवन आणि स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक जीवन यामध्ये खूप अंतर आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व भाषिक हे घटक प्रादेशिकतेनुसार बदलतात याचा प्रभावी प्रत्यय रा.रं.बोराडे, विश्वास पाटील, मधुकर वाकोडे, राजन गवस, सुभाष भेंडे, यांच्या साहित्यामधून पहावयास मिळतो. विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबरी लेखनामधून प्रादेशिकतेच्या वेगवेगळ्या स्वरूपाचे विहंगम दर्शन घडते.

प्रादेशिकतेच्या संकल्पनेतील एक उपअंग म्हणून देशीवाद या साहित्याचा विचार करता येतो आपल्या भूमीशी जुळलेली आपली नाळ आपली संस्कृती, भाषा आणि मूल्ये यांच्यावर जेव्हा आक्रमण होऊ लागते अशावेळी देशाबद्दलचे उत्कट प्रेम, भावना, वृत्ती या साहित्यामधून प्रकट होताना दिसतात. याच काळातील दलित साहित्याने केवळ मराठी अथवा भारतीय साहित्यातच नव्हे तर जागतिक पातळीवर नवे अनुभव विश्व आणि नवीन मूल्ये, संवेदना व्यक्त करण्याचे सामर्थ्य दाखवले [illegible] देऊन साहित्यामध्ये वास्तवदर्शी अनुभव मांडून साहित्याला नवी ओळख निर्माण कर[illegible] व साहित्य प्रकार रूढ केला. दलित साहित्य हे दलित चळवळीतून निर्माण झालेली [illegible] आहे. कुठलेही साहित्य हे एक प्रकारचा आत्मशोध वा स्वतःचा शोध असतो. दलित साहित्यही याला अपवाद नाही परंतु हा आत्मशोध आंबेडकर विचार आत्मसात केलेल्या साहित्यिकांचा आहे हे त्यांच अन्य साहित्यिकांपेक्षा वेगळपण आहे असं म्हणावं लागेल. या साहित्यात समता,न्याय,आणि बंधुत्वाचा पुरस्कार

असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक चळवळी उदयास आल्या होत्या त्यापैकीच आपल्या हक्कांसाठी आपल्या अधिकारांसाठी आणि स्वातंर्त्यासाठी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करणारी एक चळवळ उभी राहत होती १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात या चळवळीचे पुनरूज्जीवन झाले ती म्हणजे स्त्रिमुक्तीची चळवळ स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूद्ध स्त्रिया संघटित होऊन आवाज उठवू लागल्या स्त्री पुरूष विषमतेवर हल्ला चढवू लागल्या परंपरेने चालत आलेल्या पुरूषप्रधान संस्कृतीला विरोध करू लागल्या व आपले अनुभव विश्व आपल्या व्यथा वेदना आठवणी साहित्यातून चित्रित करू लागल्या त्याला स्त्रीवादी साहित्य असे म्हटले गेले, कथा, कविता, कादंबरी आणि आत्मचरित्र या साहित्य प्रकारातून स्त्रियांनी विपुल स्वरूपात साहित्य निर्मिती केली, यामध्ये मल्लिका अमर शेख, अनुराधा पाटील, विजया संगवई, प्रज्ञा लोखंडे, प्रभा गणोरकर त्याचबरोबर सानिया,गौरी देशपांडे, मेघना पेठे या स्त्री लेखिकानी स्त्रीवादी साहित्याची निर्मिती केली. हजारो वर्षापासून ज्यांना आपलं आयुष्य जंगलामध्येच व्यतीत करावं लागलं, नेहमीच त्यांच्याकडे वनवासी म्हणून पाहिलं गेलं अशा आदिवासी लोकांचे जीवन चित्रीत करणा?या साहित्याला आदिवासी साहित्य असे म्हटल्या गेलं, यात त्यांच्या जीवन व्यथा, जीवन जगतानाची काट्यावरची कसरत, निसर्ग व त्यांच नातं या विषयी भुजंग मेश्राम, व्यंकटेश आत्राम, नजुबाई गावित, आत्माराम राठोड, कॉम्रेड गोविंद गारे,यांनी लिखाण केलेआहे. सबंध मानवी जीवनात झालेल्या परिवर्तनाचे आणि अस्तित्वाचे चित्रण या प्रवाहातील साहित्यामध्ये दिसून येते.

**समारोप :**

मराठी साहित्यातील वांडमयीन प्रवाहांचा अभ्यास करत असताना वेगवेगळ्या कालखंडातील मानवी जीवनातील स्थळ, काळ आणि परिस्थितीनुरूप निर्माण झालेल्या साहित्य निर्मितीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब दिसून येते त्याचे अनुभव वेगवेगळ्या साहित्यातील प्रवाहामधून पहावयास मिळतात.

**संदर्भ.**

१. प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहासः ल.रा.नसिराबादकर
२. आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहासः वसंत बिरादार
३. स्वतंर्त्योत्तर वाड्मयीन प्रवाहः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. पुनर्मुद्रण २०२० पृष्ठ क्र.०२,०९
४. ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि शोध. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
५. साहित्याची भाषा : भालचंद्र नेमाडे


◈◈◈

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## December Special Issue : III - 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | २००० नंतर ललितगद्यातील बदलते चित्रण | ज्योती सुधाकर चव्हाण | 149-153 |
| 31 | एकविसाव्या शतकातील ' सर्व प्रश्न अनिवार्य' | अंगद श्रीपती भुरे | 154-159 |
| 32 | मराठी साहित्यातील विविध प्रवाह: स्थितीगती आणि मूल्यमापन. | ज्ञानदेव रामभाऊ रणशूर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 160-163 |
| 33 | देशीवाद आणि समकालीन मराठी कादंबरी | वऱ्हाडे बापुराव भास्कर | 164-167 |
| 34 | आदिवासी कथा साहित्याचे स्वरूप | शंकर रामजी बर्गे<br>डॉ.एम.ए.कव्हळे | 168-171 |
| 35 | बालकिशोरांची अवकाशज्ञानाची जिज्ञासापूर्ती करणारा काव्यसंग्रह- 'आकाशगंगा ' | प्रा.पुरुपोत्तम प्र. सूर्य | 172-175 |
| 36 | समकालीन व्यक्तिचित्रे : एक आकलन | भगवान मुरलीधर बांगर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 176-179 |
| 37 | समाजव्यवस्थेची कानउघाडणी:बिघडलेले होकायंत्र | मधुकर बालासाहेब जाधव<br>डॉ.ललित अधाने | 180-182 |
| 38 | २००० नंतरचे आदिवासी साहित्य | बागुल कौशल्या तुळशीराम<br>डॉ.भाऊसाहेब विठ्ठलराव गमे | 183-186 |
| 39 | साहित्यातील विविध प्रवाह : २००० नंतरची निर्मिती,स्थितीगती आणि मूल्यमापन | शैलजा सटवा ओव्हाळ<br>डॉ.मनोहर सिरसाट | 187-193 |
| 40 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्यातील कादंबरी | सौ.विजया योगेश साळोखे | 194-196 |
| 41 | २००० नंतरच्या भटक्याविमुक्तांच्या कवितेतून प्रकट होणारे अनुभव विश्व | मनोज रामजी मुनेश्वर | 197-203 |
| 42 | " २००० नंतरच्या निवडक स्त्रीवादी कादंबऱ्या " | अंजली विठ्ठलराव मुसांडे | 204-209 |
| 43 | इ.स. २००० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | शिंदे अनिता पर्वती<br>प्रा.डॉ.बालाजी नागटिळक | 210-214 |
| 44 | २००० नंतरची मराठी कादंबरी आणि किशोरवयीन व्यक्तिरेखा | श्री. सुनील अंबादास आहिरे<br>डॉ.किरण नामदेव पिंगळे | 215-221 |
| 45 | शांता जर्नादन शेळके: व्यक्ती आणि वाङ्मय | सौ.अंजली माधव देशपांडे | 222-223 |
| 46 | जागतिकीकरणात मराठी साहित्य आणि संस्कृतीचे अस्तित्व | डॉ.बी.जी.श्रीरामे | 224-227 |

# समकालीन व्यक्तिचित्रे : एक आकलन

**भगवान मुरलीधर बांगर**
संशोधक विद्यार्थी

**डॉ.भाऊसाहेब राठोड**
संशोधक मार्गदर्शक
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

मराठी वाड्मयाची निर्मिती मध्ययुगीन काळापासून आजपर्यंत अखंडपणे चालू आहे. पण या वाड्मयाने बदलत्या काळाप्रमाणे धारण केलेली रूपे अशी वैशिष्ट्यपूर्ण आहेत हे तपासण्याचे काम "मराठी वाड्मयातील भावी चित्रांचा अभ्यास" (प्रसिद्ध भावी चित्र लेख संग्रहाच्या आधारे १९२० ते १९२० पर्यंत) या शोध निबंधात केले आहे. मध्ययुगीन काळातील वाणमय गद्य व पद्य स्वरूपात लिहून दिसून येते. पद्य वाड्मयात अभंग, ओवी, भारूड, गवळणी, आरत्या, पोवाडे लावणी या. सारखे विविध रूप संबंध रूपबंध आहेत. आधुनिक वाड्मयात कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र आणि ललित गद्य इत्यादी वाडमयप्रकार प्रचलित असल्याचे दिसून येतात.

भावचित्रे हा लेखन प्रकार ललित गद्यात समाविष्ट केला आहे त्याला स्वतंत्र वाड्मय प्रकार म्हणून समीक्षकांनी मान्यता दिली नाही. ललित गद्याचा स्वतंत्र वाड्मय प्रकार म्हणून हा लेखन प्रकार मराठी वाड्मयात समाविष्ट झाला आहे. इंग्रजी भाषेतील sketch यावरून मराठीत शब्दचित्र, रेखाचित्र स्वभावचित्र इत्यादी नावानी हा लेखनप्रकार आकारास आल्याचा दिसतो. आधुनिक मराठी वाड्मयामध्ये १९२० ते १९३५ च्या दरम्यान व्यक्तिचित्रे लेखनाची सुरूझालेली चळवळ आज २००० नंतर काही लेखक, लेखिकांनी सुरू ठेवल्याचे दिसून येते. त्याचा आढावा प्रस्तुत शोध पत्रिकेमध्ये घेण्याचा प्रयत्न आहे.

**व्यक्तिचित्रे : वाड्मयप्रकार**

व्यक्तिचित्रे वाड्मय इतिहासः- व्यक्तिचित्रे वाड्मय हे कथा, कादंबरी, नाटक, कविता यांच्यासारखे स्वतंत्र वाढवले आहे.

आधुनिक मराठी वाड्मयामध्ये १९३० ते १९३५ च्या दरम्यान लघुकथेचे लक्ष 'व्यक्तीकडे' अधिक जाऊ लागले, कथेतील कथनापेक्षा (घ्द्द्य) पात्रचित्रण यावर अधिक लेखक भर देऊ लागले. 'व्यक्तिचित्र लेखन' ही त्याच्या पुढची पायरी होती.

१९३२ मध्ये कुमार रघुवीर यांनी 'ह्मदय' नावाचा व्यक्तीचित्र संग्रह लिहून मराठीत प्रथमच व्यक्तिचित्र वाड्मयाला 'स्फुटगद्य' म्हणून वेगळे स्थान मिळवून दिले. मराठीत 'कुमार रघुवीरांनीच' व्यक्तीचित्र लेखनाची मुहूर्तमेढ रोवली. १९३० पूर्वी कथा, लघुकथा,लघुत्तमकथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन व पौराणिक वाड्मय या समृद्ध साहित्य प्रकाराशिवाय दुस?्या नव्या साहित्य प्रकाराची कल्पनाच केली जात नव्हती. परंतु १९३० नंतर कुमार रघुवीर, वि.द.घाटे, कमलाबाई देशपांडे, ताराबाई मोडक, माधवराव बागल, मधुकर केचे, पु.ल.देशपांडे, चि.त्र. खानोवळकर व व्यंकटेश माडगूळकर या प्रतिभावान लेखकांनी 'समृद्ध व्यक्तिचित्रे' लिहून व्यक्ती आणि समाज जीवनातील वृत्ती-प्रवृत्तीचा शोध

घेऊन व्यक्तीचित्र साहित्यप्रकार वाचकाभिमुख बनवण्याचे काम केले. आज मराटीत कथा, कादंबरी, नाटक, कविता वाड्मयासारखेच व्यक्तिचित्रे वाड्मयातला एक ललितगद्य वाड्मय म्हणून स्वतंत्र आहे. याचे विद्यापीठ स्तरावर सध्या संशोधन चालू आहे.

व्यक्तीचित्रे एक ललित स्फुट गद्य प्रकार :

मराठी वाड्मयामध्ये 'व्यक्तिचित्र' वाड्मय एक ललित स्फुट गद्य वाड्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. प्रस्तुत व्यक्तीचित्र लेखकांनी केवळ व्यक्तीचे अंतरबाह्य व्यक्तीचित्रण कलाकृतीमध्ये केले नसून त्यामध्ये व्यक्तीचे सामाजिक संबंध, त्यांच्या अवतीभवतीचे वातावरण, व्यक्तीच्या बाह्य स्वभावाबरोबरच अंतर्गत स्वभावाचे सूक्ष्म अवलोकन केले आहे. तसेच व्यक्तीचा नर्मविनोद, त्याचे चिंतनगर्भ अनुभव, सौंदर्य याचे चित्र लालित्य व रंजक भाषाशैलीतून वाचकांसमोर उभे केले आहे. व्यक्तिचित्रांमध्ये भाषेचे लालित्य, रंजकता, व्यक्ती स्वभावातून वेगळा तंत्रविचार, वातावरण निर्मिती, विविध संवाद, मनमोकळेपणा, वाचकांची उत्कंटा वाढवण्याचे कौशल्य इ. भाषेचे वाड्मयीन गुण आढळतात.

**'व्यक्तिचित्र' हा शब्द :-**

इंग्रजीतील 'स्केच' या शब्दाला मराटीत 'व्यक्तिचित्र' हा पर्यायी शब्द वापरण्यात येत असला तरी व्यक्तिचित्र वाड्मयाची निर्मिती इंग्रजी साहित्यातून झाली नसून ती मराटीतूनच झाली आहे. तसेच व्यक्तीचित्र हा शब्द मराठीत स्वभावचित्र, शब्दचित्र व व्यक्तिरेखा या विविध अंगाने जरी प्रकट होत असला तरी या शब्दातील सूक्ष्म फरक म्हणजे सर्वांमध्ये लेखकांनी व्यक्तिचित्रे उभी केली आहेत. म्हणजे या शब्दाचा अर्थ व्यक्तिचित्र हा आहे.

**व्यक्तिचित्रे स्वरूप :**

व्यक्तिचित्रांचे स्वरूप व्यापक आहे. 'यक्ती तितक्या प्रवृती' या उक्तीप्रमाणे समाजामध्ये अनेक प्रकारच्या व्यक्ती असतात. अशा अनेक प्रकारच्या व्यक्तींचा स्वभाव वेगळा असतो. त्यांच्या स्वभावात, त्यांच्या राहणीमानात, त्यांच्या कार्य कुशलतेमध्ये एक प्रकारचे वेगळेपण असते. आणि हेच वेगळेपण सर्जनशील लेखक आपल्या प्रतिभेच्या जोरावर ओळखत असतो. अशा व्यक्तीविषयी सर्वसामान्य माणसाला एका प्रकारचे कुतुहल असते. लेखक आपल्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून अशा 'आगळ्यावेगळ्या' माणसांचे सूक्ष्म निरीक्षण करतो. अशा व्यक्तींच्या जीवनातील काही महत्त्वपूर्ण घटना, अविस्मरणीय आटवणी व त्यांचा लक्षणीय प्रवास यांचे सूक्ष्म अवलोकन करून त्यांच्या जीवनावर, कार्य कर्तुत्वावर व स्वभाव गुण वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतो. व्यक्तींची ही सर्व 'स्वभावगुणवैशिष्ट्ये' सर्जनशील शब्दांच्या माध्यमातून लेखक 'व्यक्तिचित्रे साहित्यामध्ये' रेखाटत असतो. व्यक्ती चित्रात व्यक्तीचे विविध पैलू दाखविण्यावर लेखकाचा भर असतो एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील ध्येयवाद, ज्ञानोपासना, चिकाटी, त्यांची जिद्द व महत्त्वकांक्षा त्याने कशी जोपासली. तसेच वाईट किंवा बिकट परीस्थितीवर भाव करून शिखर कसे गाटले हे शब्दांच्या माध्यमातून दाखवण्याचा प्रयत्न लेखक व्यक्तिचित्रांमध्ये करीत असतो. लेखक आपल्या सर्जनशील लेखनातून असामान्य व्यक्तीकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचे काम करीत असतो. विशेषता

'व्यक्तिचित्रवाङ्मयाचा' समाजाच्या जडणघडणीमध्ये मोठा वाटा असून अशा प्रकारची व्यक्ती चित्रे समाजासाठी दिपस्तंभ ठरलेली आहे.

**व्यक्ती चित्रातील 'पात्र' चित्रण :**

व्यक्तीचित्रांमधून येणारे पात्र किंवा व्यक्ती समाजाला एक 'वास्तववादी' जीवनाचा अर्थ समजावून सांगत असतात. व्यक्तीचे जीवन जसे रसाने भरलेले आहे तसेच ते प्रेमाने, विनोदी व खेळकर वृत्तीने काही व्यक्ती अनुभवत असतात

१. कुमार रघुवीर यांच्या 'ह्यदय' व्यक्ती संग्रहात येणारी पात्रे :- जसे अंध भिकारी, कारकून, भंगीन, कोळीण, ही सर्वजण आपले जीवन खेळकर पणाने जगली.

२. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' मध्ये येणारी पात्र जसे धर्मा रामोशी, झेल्या, मुलाण्याचा बकस, कोंडीबा गायकवाड, तांबोळयाची खाला हे आपल्या जीवन दारिद्रयात व अज्ञानात जगलेली असतात. एकंदरीत माणदेशातील दारिद्रय माणदेशी माणस व्यक्ती चित्रातून वाचकापुढे उभे राहते. माणूस त्यामुळे अंतर्मुख होतो.

३. मंगेश तेंडुलकर यांनी आपल्या 'प्रिय बाबांचे' व्यक्तिचित्र दारिद्रयातही आपली अस्मिता जपणारे म्हणून वाचकापुढे उभे केले आहे.

४. चैताली भोगले यांची 'शितल महाजन' : हिच्यातील धाडस जिद्द आणि महत्त्वकांक्षा यांना भावचित्र टिपले आहे .

५. स्वप्नाली अभंग : यांनी जयवंत पाटील हा व्यक्ती आय-टी तज्ज्ञ असून सेंद्रिय शेतीतून नवनिर्मितीचा आनंद कसा मिळतो हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. अशी व्यक्ती चित्र समाजासाठी प्रेरणादायी ठरलेली आहेत.

**व्यक्ती चित्रांचे प्रकार :** व्यक्ती चित्रांचे एकूण दोन प्रकार आहेत

**काल्पनिक व्यक्तिचित्रे :**

काल्पनिक व्यक्ती चित्रातील व्यक्ती लेखक आपल्या कल्पनेने उभी करतो. त्या व्यक्ती वास्तविक जीवनात लेखकाला कधीच भेटलेला नसतात मात्र अशा काल्पनिक व्यक्तीचे स्वभाव वैशिष्टये वास्तवादी व्यक्तीच्या जीवनाशी समरस झालेले असतात.

ना.धो.ताम्हणकरांचे 'गोटया' हे व्यक्तीचित्र गोटया या मुळातील टिंगल टवाळीची खोडकर वृत्ती अनेक मुलातआपल्याला दिसते. पु.ल देशपांडे यांचे 'व्यक्ती आणि वल्ली' या दोन व्यक्ती चित्रातील व्यक्तीचे जीवन लेखकाने आपल्या कल्पनेतून निर्माण केले आहे.

**वास्तववादी व्यक्तीचित्रे:**

वास्तववादी व्यक्ती चित्रातील व्यक्ती लेखकाला प्रत्यक्ष जीवन प्रवासात भेटलेल्या असतात. अशा व्यक्तींचे जीवन वैशिष्टये लेखकाने जवळून अनुभवलेले असते.

१. व्यंकटेश माडगूळकर 'मानदेशी माणसं'

२. ना.धो. ताम्हणकरांची 'ऐसी कळवळ्याची जाती'

३. अरुण शेवटे यांचे 'हातीशून्य होते' अशा प्रकारे व्यक्तिचित्र वाङ्मयाचे महत्त्व आहे.

**व्यक्तिचित्रांचे वाङ्मयीन मूल्यमापन :**

व्यक्तिचित्रे रेखाटणाऱ्या लेखक-लेखिकांचे व्यक्तिमत्व अप्रत्यक्षरित्या त्या व्यक्तिचित्रांमधून साकारत असते. व्यक्तिजीवनाचा, त्यांच्या स्वभावाचा अभ्यास, बहुश्रुतता, चोखंदळपणा यातून ती कलाकृती आपले वेगळे वाङ्मयीन रूप साकार करीत असते. व्यक्तिचित्रांमध्ये काही वाङ्मयीन गुण विशेष सापडतात. ते असे, भाषेची रंजकता, विविधता, नर्मविनोद, भाषेचे लालित्य, वाचकांची उत्कंठा वाढवण्याचे कौशल्य, मानसशास्त्रीयदृष्ट्या व्यक्तिच्या वाहय व अंतरंग स्वभावाचे सुक्ष्म व भावतरल दर्शन, वैविध्यपूर्ण संवाद, व्यक्तिस्वभावातून वेगळा तंत्रविचार, वातावरण निर्मिती व्यक्तिसंवादातून जाणवणारे संस्कार, व्यक्तिसंवादात बोलीभाषेचा वापर, खटयाळ विनोद, व्यक्तिचित्रातून येणारा मनमोकळेपणा, भावोत्कट भावभावनाचे विविध नाटयपुर्ण खेळ, व्यक्तिमनातील विचारांचे सुक्ष्म आंदोलने, व्यक्तिच्या चैतन्य शुन्यतेतून विनोदाची लकब इ. व्यक्तिचित्रांचे मूल्यमापन गुण-विशेषांच्या संदर्भात मूल्यमापन महत्वाचे वाटते.

व्यक्तिचित्रांचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना त्यातील भाषाशैली, सौदर्यदृष्टी, तंत्रविचार, लालित्य, गांभीर्यता, अभिव्यक्ती, अभिरूची, शैली व शैलीविचार, चितनगर्भ अनुभव व स्वरूप विशेष, सृष्टीसौंदर्य, कथात्मक निवेदन शैली इत्यादी वाङ्मयीनदृष्टीने मूल्यमापनाचा विचार करण्यात आलेला आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. जोशी प्र.न. 'आदर्श मराठी शब्दकोश' विदर्भ मराटवाडा बुक कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती-१९७०.

२. देशपांडे अ.ना - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (भागर) व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी १९५८.

३. राजाध्यक्ष विजया (संपा.) मराठीवाङ्मय कोश खंड चौथा, (समीक्षा संज्ञा) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००२

४. हरदयाळ 'आधुनिक हिंदी गद्य साहित्य' आदर्श साहित्य प्रकाशन दिल्ली, प्रथमावृत्ती १९७२.

५. शर्मा हरवंशलाल, 'हिंदी रेखाचित्र' हिंदी समिती, सूचना विभाग (उ.प्र)लखनौ प्रथमावृत्ती १९६९

६. मिश्रा दुर्गाशंकर, 'साहित्यिक निबंध' प्रकाशन केंद्र, लखनौ प्रथमावृत्ती, १९७४

७. कुलकर्णी कृ.पां., 'मराठी व्युत्पत्ती कोश' ग.ल.टोकळ प्रकाशन पुणे, द्वित्तीयावृत्ती,जानेवारी १९७४.

८. आपटे वा.गो.(संपा.) 'मराठी शब्दरत्नाकर' आनंद कार्यलय प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती १९५३.

९. पाटक वामन, 'टीका आणि टीकाकर', न्याशनल इनफॉरमेशन अंड पब्लिकेशन्स लिमिटेड मुंबई, प्रथमावृत्ती १९४८

१०. कुलकर्णी मधु , 'ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण', सुभदा सारस्वत पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८६

◇◇◇

ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

## December Special Issue : III - 2022



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | २००० नंतर ललितगद्यातील बदलते चित्रण | ज्योती सुधाकर चव्हाण | 149-153 |
| 31 | एकविसाव्या शतकातील ' सर्व प्रश्न अनिवार्य' | अंगद श्रीपती भुरे | 154-159 |
| 32 | मराठी साहित्यातील विविध प्रवाह: स्थितीगती आणि मूल्यमापन. | ज्ञानदेव रामभाऊ रणशूर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 160-163 |
| 33 | देशीवाद आणि समकालीन मराठी कादंबरी | वऱ्हाडे बापुराव भास्कर | 164-167 |
| 34 | आदिवासी कथा साहित्याचे स्वरूप | शंकर रामजी बर्गे<br>डॉ.एम.ए.कव्हळे | 168-171 |
| 35 | बालकिशोरांची अवकाशज्ञानाची जिज्ञासापूर्ती करणारा काव्यसंग्रह- 'आकाशगंगा ' | प्रा.पुरुषोत्तम प्र. सूर्य | 172-175 |
| 36 | समकालीन व्यक्तिचित्रे : एक आकलन | भगवान मुरलीधर बांगर<br>डॉ. भाऊसाहेब राठोड | 176-179 |
| 37 | समाजव्यवस्थेची कानउघाडणी:बिघडलेले होकायंत्र | मधुकर बालासाहेब जाधव<br>डॉ.ललित अधाने | 180-182 |
| 38 | २००० नंतरचे आदिवासी साहित्य | बागुल कौशल्या तुळशीराम<br>डॉ.भाऊसाहेब विठ्ठलराव गमे | 183-186 |
| 39 | साहित्यातील विविध प्रवाह : २००० नंतरची निर्मिती,स्थितीगती आणि मूल्यमापन | शैलजा सटवा ओव्हाळ<br>डॉ.मनोहर सिरसाट | 187-193 |
| 40 | २००० नंतरच्या स्त्रीवादी साहित्यातील कादंबरी | सौ.विजया योगेश साळोखे | 194-196 |
| 41 | २००० नंतरच्या भटक्याविमुक्तांच्या कवितेतून प्रकट होणारे अनुभव विश्व | मनोज रामजी मुनेश्वर | 197-203 |
| 42 | " २००० नंतरच्या निवडक स्त्रीवादी कादंबऱ्या " | अंजली विठ्ठलराव मुसांडे | 204-209 |
| 43 | इ.स. २००० नंतरचे स्त्रीवादी साहित्य | शिंदे अनिता पर्वती<br>प्रा.डॉ.बालाजी नागटिळक | 210-214 |
| 44 | २००० नंतरची मराठी कादंबरी आणि किशोरवयीन व्यक्तिरेखा | श्री. सुनील अंबादास आहिरे<br>डॉ.किरण नामदेव पिंगळे | 215-221 |
| 45 | शांता जर्नादन शेळके: व्यक्ती आणि वाड्मय | सौ.अंजली माधव देशपांडे | 222-223 |
| 46 | जागतिकीकरणात मराठी साहित्य आणि संस्कृतीचे अस्तित्व | डॉ.बी.जी.श्रीरामे | 224-227 |

# मराठी साहित्यातील विविध प्रवाहः स्थितीगती आणि मूल्यमापन

**ज्ञानदेव रामभाऊ रणशूर**
संशोधक

**डॉ.भाऊसाहेब राठोड**
मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना :**

साहित्य ही व्यापक संकल्पना आहे, तर वाङ्मय ही एक कला आहे. साहित्यामध्ये ललित आणि ललितेत्तर साहित्य असे दोन भाग पडतात. ललित साहित्यात कल्पना, भावना लेखकाची अभिव्यक्ती व अनुभव व्यक्त होत असतात तर ललिततेत्तर साहित्यात वैचारिकतेला प्राधान्य दिले जाते. मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रवाहांचा अभ्यास करत असताना प्राचीन साहित्य,अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य आणि समकालीन साहित्य या तीन प्रकारांचा थोडक्यात परामर्श घेता येईल.

प्राचीन साहित्य.

साधारणपणे ११ व्या शतकापासून तर १८ व्या शतकापर्यंत प्राचीन मराठी साहित्याचा विचार होतो या कालखंडात महानुभाव संप्रदायाच्या साहित्याने सुरुवात होऊन वारकरी संप्रदायाच्या संत ज्ञानेश्वरांपासून तर संत रामदास यांच्यापर्यंत तसेच पंडिती साहित्यातील मुक्तेश्वरांपासून तर मोरोपंतांच्या साहित्यापर्यंत आणि शाहिरी साहित्यातील राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा यांच्या साहित्य रचनेचा विचार होतो. प्राचीन साहित्य रचना काव्यात्म आहे. तसे संस्कृत साहित्य काव्यात्म स्वरूपाचेच आहे. मुळात साहित्याची सुरुवात ही काव्यातुन झालेली आहे.

**अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य.**

१८ व्या शतकापासून निर्माण झालेल्या मराठी साहित्याला अर्वाचीन साहित्य किंवा आधुनिक साहित्य असं म्हटल जात या शतकाच्या सुरुवातीला मराठी राज्याचा अस्त झाला आणि महाराष्ट्रामध्ये इंग्रजी राजवटीची सत्ता आली ही सत्ता जवळपास दीडशे वर्ष या देशात चालली, इंग्रजी राजवटी मधील इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून या काळातील लिखाण झाले. १९८५ पर्यंतचा काळ हा तर अव्वल इंग्रजी कालखंड म्हणून ओळखला जातो. इंग्रजी साहित्याची भाषांतरे, रूपांतरे तसेच अनुकरण यातून अर्वाचीन किंवा आधुनिक साहित्याची वाटचाल सुरू झाली. मराठी साहित्य-विचाराची जडणघडण तत्कालीन नियतकालिकांमुळे महत्वाची ठरते. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ मध्ये सुरू केलेल्या मराठीतील पहिल्या 'दर्पण' या पत्राने महाराष्ट्रात प्रबोधन युगाचा प्रारंभ झाला आणि समाजातील वेगवेगळे प्रश्न पुढे येऊ लागले त्याचबरोबर ज्ञानोदय, मराठी ज्ञान प्रसारक, विविध ज्ञानविस्तार, निबंधमाला १८७४, मनोरंजन-निबंधचंद्रिका १९८७ या नियतकालिकांची भूमिका महत्त्वाची ठरते. १८८५ ते १८२० हा काळ मराठी कथा कादंबरी, काव्य आणि नाटक या वाङ्मय प्रकारांच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचा ठरतो. १८८३ मधील किर्लोस्करांचे पहिले 'सौभद्र' नाटक, हरि नारायण आपटे यांची १९८५ मधील 'मधली स्थिती'

ही कादंबरी तर केशवसुतांची १८८५ मधील पहिली कविता ही साहित्य निर्मिती आधुनिक साहित्यातील पहिले साहित्य  ठरते.

**समकालीन साहित्य :**

समकालीन साहित्याचे अस्तित्व १९४५ नंतरच्या काळात दिसून येते. समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळा सोबत असते ज्या काळात ते निर्माण होते त्या काळातील एकूण प्रतिबिंब त्या मध्ये स्पष्ट दिसून येते त्या काळातील विचार त्या काळातील भावना त्या काळातील प्रश्न त्या काळातील जाणिवा त्या काळातील मतं ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य, साधारणपणे हा कालखंड भारतीय स्वातंर्त्याचा कालखंड होता या काळात भारतीय स्वातंर्त्यामुळे मानवी जीवनात जो अमुलाग्र बदल झाला त्या बदलाचे प्रतिबिंब समकालीन साहित्यामध्ये अग्रक्रमाने मांडलेले दिसते.

**वाङ्मयीन चळवळीचे स्वरूप :**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७० वर्षाच्या काळामध्ये मराठी साहित्याने अनेक स्थित्यंतराचा अनुभव घेतलेला आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात घडून आलेले दुसरे जागतिक महायुद्ध ही जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना ठरली आहे १९३९ ते १९४५ अशा दीर्घ कालखंडात चाललेल्या या जागतिक महायुद्धाने संपूर्ण जगाचा नकाशा बदलला. हुकूमशाही राजवटीचा अंत होऊ लागला रशियामध्ये साम्राज्यवादाचा उदय झाला याच काळात भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात येत होती संपूर्ण जगाला या महायुद्धाने सावध केले होते अशा एक ना अनेक घटनांमुळे समाज जीवनात वेगवेगळे बदल दिसून येत होते दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम सामाजिक राजकीय आर्थिक जीवनावर झाला तसाच तो जागतिकीकरणावर आणि वाङ्मयावर देखील झाला या एकूण परस्पर संबंधांमुळे साहित्यामध्ये अनेक बदल झाले वांग्मयीन चळवळी व नव साहित्य प्रवाह उदयास आले साहित्यामध्ये आशय आणि अभिव्यक्ती दोन्ही अंगाने अधिक बदल होत गेले शिक्षण प्रसार सामाजिक मूल्यांवर आधारित असलेली समाज रचना त्याचबरोबर प्रांतवार भाषेला दिलेले महत्त्व यामुळे प्रादेशिक भाषेला स्वतःचे मिळालेले अस्तित्व या सगळ्या घटनांमुळे मराठी साहित्य व वांग्मय चळवळ अधिक बळकट होत गेली व मानवी जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करत राहिली यातूनच या काळातील साहित्य हे नव साहित्य म्हणून उदयास आले या साहित्याला स्वातंर्त्यपूर्व साहित्य आणि स्वातंर्त्योत्तर साहित्य असे ही म्हटले गेले.

**साहित्यातील विविध प्रवाह :**

मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य,स्त्रीवादी साहित्य, प्रादेशिक साहित्य, विज्ञान साहित्य, मुस्लिम साहित्य, महानगरीय साहित्य,बालसाहित्य, ललित गद्य अशा वेगवेगळ्या साहित्य प्रवाहाचा विचार करता येतो या सर्व साहित्य प्रवाहामधून विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती झाली. या कालखंडातील महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून ग्रामीण साहित्याकडे पाहिले जाते. त्याच्या केंद्रस्थानी शेतकरी असून 'शेती पिकली तर सगळे

जगतील' हे मुख्य सूत्र असल्याने त्याला जीवनदाता असे संबोधले गेले परंतु या जीवनदात्याच्या जीवनात अनेक प्रश्न आहेत त्या प्रश्नांना घेऊन ग्रामीण साहित्याची सुरुवात झाली ग्रामीण भागातील जीवनानुभव, रूढी-परंपरा, संस्कार, संस्कृती तेथील दुःख-दैन्य, शैक्षणिक स्थिती, ग्रामीण भागातील राजकारण, ग्रामीण जीवनातील अपेक्षाभंग, ग्रामीण मनाचा उद्रेक, अशा एक ना अनेक प्रश्नांना घेऊन दिशा देण्याचे काम ग्रामीण साहित्याने केले.एकूण ग्रामीणतेचा परीघ साठोत्तरी साहित्यातील कथा, कादंबरी,काव्य या मधून मोठ्या प्रमाणात दिसून येतो. १९९० नंतरच्या कालखंडात तर मोठ्या प्रमाणात ग्रामीण साहित्य निर्मिती झाली त्यातील काव्य रचनेत अनेक कवी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशात अनुभवांचे संचित आपल्या काव्यरूपातून मांडताना दिसतात. यामध्ये प्रामुख्याने इंद्रजीत भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, प्रकाश होळकर, केशव देशमुख, गणेश देशमुख, एकनाथ पाटील, प्रदीप पाटील, अजय कांकर, लक्ष्मण महाडिक, नारायण सुमंत,दयासागर बन्ने, गोविंद पाटील, रमेश चिल्ले, प्रकाश किनगावकर, प्रकाश घोडके, जयराम खेडेकर, अशा अनेक कवींचा उल्लेख करता येतो या एकूणच कवींनी आपल्या साहित्यात बदलत्या ग्राम संस्कृतीचे चित्रण, निसर्ग व शेतकऱ्यांचे जीवन, त्याचे भाव विश्व, मातीची सर्जकता, कृषी संस्कृतीतील भावविश्व, ग्रामीण माणसाचे दुःख, जीवन जाणिवा, ग्राम संस्कृतीतील स्त्रीचे भावविश्व, तिचे मनोधैर्य, शोषितपणा, जगण्यातील शहाणपण असे अनेक प्रश्न घेऊन ग्रामीण साहित्यात जिवंतपणा निर्माण केला. प्रादेशिक साहित्याचा विचार करता प्रादेशिक जीवन पद्धती भाषा विचार यानुसार साहित्य बदलत जाते हे प्रादेशिक साहित्या मध्ये पहावयास मिळते. स्वातंत्र्यपूर्व प्रादेशिक जीवन आणि स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक जीवन यामध्ये खूप अंतर आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक व भाषिक हे घटक प्रादेशिकतेनुसार बदलतात याचा प्रभावी प्रत्यय रा.रं.बोराडे, विश्वास पाटील, मधुकर वाकोडे, राजन गवस, सुभाष भेंडे, यांच्या साहित्यामधून पहावयास मिळतो. विश्वास पाटील यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक कादंबरी लेखनामधून प्रादेशिकतेच्या वेगवेगळ्या स्वरूपाचे विहंगम दर्शन घडते.

प्रादेशिकतेच्या संकल्पनेतील एक उपअंग म्हणून देशीवाद या साहित्याचा विचार करता येतो आपल्या भूमीशी जुळलेली आपली नाळ आपली संस्कृती, भाषा आणि मूल्ये यांच्यावर जेव्हा आक्रमण होऊ लागते अशावेळी देशाबद्दलचे उत्कट प्रेम, भावना, वृत्ती या साहित्यामधून प्रकट होताना दिसतात. याच काळातील दलित साहित्याने केवळ मराठी अथवा भारतीय साहित्यातच नव्हे तर जागतिक पातळीवर नवे अनुभव विश्व आणि नवीन मूल्ये, संवेदना व्यक्त करण्याचे सामर्थ्य दाखवले [illegible] देऊन साहित्यामध्ये वास्तवदर्शी अनुभव मांडून साहित्त्याला नवी ओळख निर्माण कर[illegible] व साहित्य प्रकार रूढ केला. दलित साहित्य हे दलित चळवळीतून निर्माण झालेलो [illegible] आहे. कुठलेही साहित्य हे एक प्रकारचा आत्मशोध वा स्वतःचा शोध असतो. दलित साहित्यही याला अपवाद नाही परंतु हा आत्मशोध आंबेडकर विचार आत्मसात केलेल्या साहित्यिकांचा आहे हे त्यांच अन्य साहित्यिकांपेक्षा वेगळपण आहे असं म्हणावं लागेल. या साहित्यात समता,न्याय,आणि बंधुत्वाचा पुरस्कार

असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक चळवळी उदयास आल्या होत्या त्यापैकीच आपल्या हक्कांसाठी आपल्या अधिकारांसाठी आणि स्वातंत्र्यासाठी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करणारी एक चळवळ उभी राहत होती १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात या चळवळीचे पुनरुज्जीवन झाले ती म्हणजे स्त्रिमुक्तीची चळवळ स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूद्ध स्त्रिया संघटित होऊन आवाज उठवू लागल्या स्त्री पुरुष विषमतेवर हल्ला चढवू लागल्या परंपरेने चालत आलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीला विरोध करू लागल्या व आपले अनुभव विश्व आपल्या व्यथा वेदना आठवणी साहित्यातून चित्रित करू लागल्या त्याला स्त्रीवादी साहित्य असे म्हटले गेले, कथा, कविता, कादंबरी आणि आत्मचरित्र या साहित्य प्रकारातून स्त्रियांनी विपुल स्वरूपात साहित्य निर्मिती केली, यामध्ये मल्लिका अमर शेख, अनुराधा पाटील, विजया संगवई, प्रज्ञा लोखंडे, प्रभा गणोरकर त्याचबरोबर सानिया,गौरी देशपांडे, मेघना पेठे या स्त्री लेखिकानी स्त्रीवादी साहित्याची निर्मिती केली. हजारो वर्षापासून ज्यांना आपलं आयुष्य जंगलामध्येच व्यतीत करावं लागलं, नेहमीच त्यांच्याकडे वनवासी म्हणून पाहिलं गेलं अशा आदिवासी लोकांचे जीवन चित्रीत करणा?या साहित्याला आदिवासी साहित्य असे म्हटल्या गेलं, यात त्यांच्या जीवन व्यथा, जीवन जगतानाची काट्यावरची कसरत, निसर्ग व त्यांच नातं या विषयी भुजंग मेश्राम, व्यंकटेश आत्राम, नजुबाई गावित, आत्माराम राठोड, कॉम्रेड गोविंद गारे,यांनी लिखाण केलेआहे. सबंध मानवी जीवनात झालेल्या परिवर्तनाचे आणि अस्तित्वाचे चित्रण या प्रवाहातील साहित्यामध्ये दिसून येते.

**समारोप :**

मराठी साहित्यातील वांडमयीन प्रवाहांचा अभ्यास करत असताना वेगवेगळ्या कालखंडातील मानवी जीवनातील स्थळ, काळ आणि परिस्थितीनुरूप निर्माण झालेल्या साहित्य निर्मितीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. साहित्यामध्ये समाजाचे प्रतिबिंब दिसून येते त्याचे अनुभव वेगवेगळ्या साहित्यातील प्रवाहामधून पहावयास मिळतात.

**संदर्भ.**

१. प्राचीन मराठी वाडमयाचा इतिहासः ल.रा.नसिराबादकर
२. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहासः वसंत बिरादार
३. स्वतंर्त्योत्तर वाङ्मयीन प्रवाहः यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. पुनर्मुद्रण २०२० पृष्ठ क्र.०२,०९
४. ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि शोध. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
५. साहित्याची भाषा : भालचंद्र नेमाडे

◈◈◈